## अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. ४३/२०२३**
**निशाणी क्र. ४७**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. बाभुळगाव** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**शेख राहील** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ५** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | रविंद्र तबाजी जेधे |
| वय अंदाजे ४७ वर्षे | धंदा- नौकरी, पोलीस निरीक्षक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, अमरावती. |
| राहणार | अमरावती, जि. अमरावती. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०२२ मध्ये मी पोलीस स्टेशन बाभूळगाव येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. गुन्हा क्रमांक ८४२/२०२२ चा पुढिल तपास मला मिळाला. या गून्हयाचा प्राथमिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. मडावी यांनी केला. तपासा दरम्यान मी आरोपीचा शोध घेतला असता तो घरी मिळून आला. त्यानंतर चाकू जप्त करण्याबाबत, श्री. मडावी यांनी पंचांना नोटिस देवून बोलवले. आरोपीला चाकू बददल विचारपूस केली असता त्याने तो त्याच्या राहत्या घरातून काढून दिला व तो चाकू पंचांसमक्ष मी जप्त केला व त्याबाबत जप्ती पंचनामा तयार केला. तो जप्ती पंचनामा आता मला दाखवला, त्यावर माझी व पंचांची तसेच आरोपीची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक ४८ वर आहे**. मला आता चाकू दाखवला व तो तोच आहे व तो आर्टीकल 'क' वर आहे.

**(मध्यांनाची वेळ झालेली असल्यामुळे साक्षीदाराची सरतपासणी तहकूब करण्यात आली.)**

(पी.एस.इंगळे)
दिनांक - ०२/०२/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

**<u>साक्षीदाराची सरतपासणी मध्यांतरानंतर शपथेवर सरकारी वकिलांमार्फत सुरुः</u>**

३. त्यानंतर मी आरोपीला पोलीस स्टेशनला घेवून गेलो. मी आरोपीला अटक केली व त्याबाबत मी अटक फॉर्म तयार केला, ज्यावर माझी, पंचांची व आरोपीच्या सह्या असून त्यातील मजकूर बरोबर आहे व तो **निशाणी क्रमांक ४९ वर आहे**. मी साक्षीदारांची बयाने त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. कलम १६४ अंतर्गत बयान नोंदवून मिळण्याबाबत चे पत्र मी संबंधीत न्यायदंडाधिका–यांना दिले होते व त्या पत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक ५० वर आहे**. त्यानंतर सदर गुन्हयाच्या संदर्भात कागदपत्र मिळण्याकरीता मी तहसिलदारांना पत्र दिले होते, ज्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ते पत्र निशाणी क्रमांक २४ वर आहे. या पत्रानूसार मला श्री.कुमरे यांनी निशाणी क्रमांक २५ च्या पत्रानूसार सर्व दस्तऐवज दिले. तसेच मी घटनास्थळाचा नकाशा काढून मिळणेबाबत भूमी अभिलेख कार्यालयाला मी पत्र दिले होते, ज्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक ५१ वर आहे**. त्यानूसार भूमी अभिलेख कार्यालयाने घटनास्थळाचा नकाशा काढून दिला होता. तसेच आरोपीच्या मोबाईलचा सि.डी.आर. काढण्याकरीता मी पत्र दिले होते, ज्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक ५२ वर आहे**. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. जर आरोपी न्यायालयात हजर असता तर मी त्याला ओळखू शकलो असतो. अटक फॉर्म निशाणी क्रमांक ४९ वर आरोपीचा फोटो व सही आहे व तो फोटो आरोपीचाच असल्याचे मी ओळखतो. तपासाअंती, सबळ पुरावा मिळून आल्याने मी आरोपीच्या विरोधात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. इमरान देशमुख यांचे मार्फत सुरु</u>

४. जप्ती पंचनामा निशाणी क्रमांक ४८ वर दिनांक १४/१२/२०२२ ही तारीख त्यातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये टाकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीला बाभूळगाव पोलीस स्टेशनमध्ये अटक केली होती. हे म्हणणे खरे आहे की अटक फॉर्म निशाणी क्रमांक ४९ मधील परिच्छेद क्रमांक ८ मध्ये आरोपीकडून कोणतीही वस्तू मिळाल्याचा उल्लेख नाही. मला आठवत नाही की आरोपीकडून चाकू मिळून आल्याने तो जप्त केल्याची नोंद पोलीस स्टेशनच्या स्टेशन डायरीमध्ये केली होती किंवा नाही, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जप्ती पंचनामा व अटक फॉर्म खोटा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की चाकू च्या ओळखीबाबतचा पंचनामा मी तयार केला नाही. हे म्हणणे खरे आहे की साक्षदारांसोबत त्या चाकूबाबतची पडताळणी मी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की जप्त करण्यात आलेल्या चाकू सोबत आरोपीचा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणतीही घटना न घडल्यामुळे, मी साक्षीदारांसोबत त्या चाकूची पडताळणी केली नाही.

५. मी साक्षीदार शेख हफीजचे बयान घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की त्याने त्याच्या बयानामध्ये ***दूचाकी*** वाहन हे सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की तपासादरम्यान मी आरोपीकडून कोणतेही वाहन किंवा दूचाकी वाहन जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी तहसिल कार्यालयाच्या शासकीय वाहनाचे लॉगबूक जप्त केले नाही तसेच ते लॉगबूक मी या प्रकरणामध्ये दाखल केलेले नाही.

६. मी साक्षीदार गोपाल कावलकर यांचे बयान घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की त्याने त्याच्या बयानामध्ये ***दूचाकी*** वाहन हे सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की श्री. कुमरे हे तहसिलदार असल्यामुळे त्यांनी माझ्यावर दबाव टाकून या गून्हयाचा खोटा तपास माझ्याकडून करुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की विरखेड

फाट्याजवळ कोणतीही घटना घडली नाही, ही बाब मला निष्पन्न झाल्यावर सुध्दा मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की मी संपूर्ण पंचनामे पोलीस स्टेशनमध्ये बसून तयार केले व साक्षीदारांची बयाने मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक – ०२/०२/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.